
Interdisciplinary National Conference
On
Environment and Social Development
1st December, 2018



# Conference Proceedings

Editors

*Dr.Sanjay Dudhe*
*Dr.Varsha Vaidya*

Organised By:-
**Shri Sachhidanand Shikshan Sanstha, Nagpur**
**Department of Humanities and Social Sciences**
**Taywade College,Mahadula, Koradi, Nagpur**

**Chief Patron**
**Dr.Babanrao Taywade**
President
Shri Sachhidanand Shikshan Sanstha,
Nagpur

**Patron**
**Principal**
Dr. S.B.Taywade
Taywade College, Mahadula,Koradi

**Convener**
Dr. Sanjay S.Dudhe
Associate Professor and Head
Department of Sociology

**Organizing Secretary**
Dr.Varsha Vaidya
Associate Professor & Head, Dept of English Taywade College
Mahadula, Koradi

**Organizing Committee**
Dr. D.S.Samarth
Dr.Sharad Daware
Dr. Rajendra Watane

**Members**
*Dr. V.Sheikh, Dr. S.Ghugal, Dr.M.R.Wagh, Dr.Gajanan Polanwar, Dr.A.Bhaik, Dr.Maya Shirkhedkar, Dr.V.Chauhan, Dr.Komal Thakare, Dr.C.Waghmare*

**ISBN:978-81937717-6-1**

**-Publication-**

**Sankalp Publication**
**Vidyanagar Nagpur**
**M-8600848950**

३७.शाश्वत विकास –सामाजिक सुरक्षा........................................................ १५३

डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटे
सहाय्यक प्राध्यापक
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

३८.सामाजिक प्रश्न आणि पर्यावरण........................................................................१५९

डॉ. अनुराधा खाडे
स्व. नि. पा. वाघाये महाविद्यालय,
लाखनी.

३९.राजकीय व्यक्ती, सरकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचा पर्यावरण जागरुकता
कार्यक्रमात सहभाग...............................................................................................१६१

प्रा.मोनाली बहादूरे (समाजशास्त्र)
नूतन आदर्श महाविद्यालय, उमरेड

४०.पर्यावरण प्रदूषणाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम..............................................१६५

मनोहर भी. येरकलवार
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

४१.आर्थिक विकासाचे पर्यावरणावरिल परीणाम...........................................................१७३

प्रा. डॉ. आस्तीक मुंगमोडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर

४२ वाहनांद्वारे होणाऱ्या प्रदुष्णाविषयी महाविद्यालयीन विदयार्थ्यांमणील जागृकता – एक
अभ्यास.......................................................................१७७

डॉ. क्षमा चव्हाण
विभाग प्रमुख गृह–अर्थशास्त्र विभाग

# शाश्वत विकास –सामाजिक सुरक्षा

डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटे
सहाय्यक प्राध्यापक
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**धरणीय किंवा टिकाऊ विकासाच्या अटी :** सामाजिक स्तरांची आंतर क्रिया बळकट करणारा जबाबदार व शाश्वत असला पाहिजे.

- अशी राजनितीक प्रणाली, जी निर्णयाच्या प्रक्रियेमध्ये नागरिक मुख्य स्वरूपात भाग घेतात.
- अशी आर्थिक प्रणाली जी आपल्या परिश्रमातून आणि टिकाऊ स्वरूपाच्या आधारावर प्राद्योगिक ज्ञान निर्माण करेल.
- अशी सामाजिक प्रणाली जी गैर–सामंजस्य पूर्ण विकासातून निर्माण होणारे तणाव यांना सोडविण्यासाठी व्यवस्था असावी.
- अशी उत्पादन प्रणाली जी विकासाच्या परिस्थितीकिय आधाराला सुरक्षित राखणे आपले कर्तव्य मनात असेल. अशी प्राद्योगिक प्रणाली असावी जी निरंतर नवीन उपाय शोधू शकेल.
- अशी आंतरराष्ट्रीय प्रणाली जी व्यापार आणि वित्ताच्या टिकाऊ व्यवहार याला प्राधान्य देणे.
- अशी प्रशासकीय प्रणाली जी लवचिक असावी ज्या मध्ये झालेल्या चुकांना सुधारण्याची क्षमता असावी.

**सामाजिक सुरक्षा**

२६ जुलै २०१४ रोजी टोकियो (जपान) येथे 'संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाव्दारे (United Nations Developmwnt Programme – UNDP) पुरस्कृत 'मानव विकास अहवालाचे' (Human Development Report – HDR) प्रकाशन करण्यात आले. हे प्रकाशन जपानचे पंतप्रधान 'शिंझो अबे' यांच्या हस्ते झाले. यासमयी UNDP च्या प्रशासक (Administrator) हेलेन क्लार्क व या अहवालाचे प्रमुख लेखक खलीद मलिक हे देखील उपस्थित होते. १९९०पासून दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या या अहवालाचे या वर्षीचे बोधवाक्य किंवा विषय 'मानव विकासाचे स्थायित्व: असुरक्षा कमी करणे आणि स्थितीस्थापकत्व निर्माण करणे' (Sustaining Human Progress : Reducing Vulnerability and Bulding Resilience) हा आहे. मानव विकास साध्य कसा करावा यापेक्षा आतापर्यंत साध्य झालेला मानवी विकास पुढील काळात टिकवून कसा ठेवता येईल, म्हणजेच त्याला 'स्थायित्व' कसे प्रापत करून देता येईल यावर अधिक भर देतो.

तंत्रज्ञानामधील प्रगती, शिक्षणाचा प्रसार, वाढत्या रोजगाराच्या संधीमुळे वाढणारे उत्पादन व पोषकाचा अधिक उत्तम स्तर यामुळे जागतिक स्तरावर मानवी विकासाला चालना मिळालेली आहे आणि हे स्वागतार्हच आहे. परंतु यशप्राप्तीपेक्षा ते कायम टिकविणे अधिक महत्वाचे असते. तेव्हा जागतिक स्तरावर विशेषत्वाने २००८ नंतर अनेक धोक्याच्या व अनिश्चित परिस्थिती निर्माण झालेल्या दिसतात, ज्यामुहे लोकांच्या उपजिवीका,

वैयक्तिक तसेच जागतिक सुरक्षितता (Security) पर्यावरण आणि जागतिक राजकीय क्षेत्र हे प्रामुख्याने असुरक्षित बनलेले आहे. परिणामी आरोग्य, शिक्षण इ. क्षेत्रांमधील मानवी विकास हा नैसर्गिक आपत्ती, आर्थिक मंदी इत्यादींमुळे पुन्हा ढासळण्याची भीती निर्माण होत आहे. अशावेळेस भ्रष्टाचार व असंवादी शासन यामुळे अनेक गरजू व्यक्तीसमूह पुन्हा दारिद्राच्या चक्रामध्ये अडकण्याची भीती आहे. अशा अस्थिर परिस्थितीचा परामर्श 'मानव विकास अहवाल २०१४' यामध्ये घेण्यात आलेला आहे. हा अहवाल पुढील भागांमध्ये विभागलेला आहे.

**असुरक्षित समुह (Vulnerable Groups)**

पारंपारिक दुष्टीने 'असुरक्षा' ;टनसदमतंइपसपजलद्ध म्हणजे जोखमीला ;तेपोद्ध समोरे जाणे होय. म्हणजे नैसर्गिक किंवा आर्थिक संकटामुळे मानवी समूहांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होणे इत्यादी. परंतु या अहवा. लामध्ये 'असुरक्षा' ही संकल्पना बृहत स्वरूपाची पहिली गेली आहे. ज्याला 'मानवी असुरक्षा' (Human Vulnerability) असे म्हटले गेले आहे. 'मानवी असुरक्षा म्हणजे अशी संभाव्यता किंवा प्रतिकूल परिस्थिती होय की ज्यामुळे व्यक्तीच्या क्षमता व संधी घटत जातात.'

**कोण आहेत असुरक्षित?**

तत्वत: प्रत्येक मानव प्रतिकूल परिस्थितीपासून असुरक्षित असतो. परंतु काही लोक इतरांपेक्षा अधिक असुरक्षित असतात. जसे की, श्रीमंत व गरीब व्यक्ती दोघेंही असुरक्षेला समोरे जातात. आर्थिक मंदी, शस्त्राधारित संघर्ष, नैसर्गिक आपत्ती, सार्वदेशिक आजार यांचा परिणाम दोघांवरदेखील होतो. परंतु श्रीमंत व्यक्तीच्या तुलनेत गरीब व्यक्तीजवळ गाभभूत क्षमतांचा अभाव अधिक आढळतो. शिक्षण व उत्तम आरोग्याची कमतरता असल्याने प्रतिकूल परिस्थितीला यशस्वीरीत्या समोरे जाता येत नाही. भौतिक संपत्ती नसल्याने न्यायदेखील मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे अश्या लोकांचे अधिकाधिक शोषण होणे व तीव्र स्वरूपाच्या दारिद्रयामध्ये लोटले जाणे निनिश्चित असते. थोडक्यात किमान अपेक्षित दर्जाचे जीवन जगण्यासाठी आवश्यक साधनांची कमतरता असलेले सर्व मानव सुरक्षेने बाधित असतात.

आजही जगभरामध्ये १.५ अब्ज लोक बहुआयामी दारिद्रयामध्ये जीवन जगतात. (२०१२) दक्षिण आशियामध्ये ४४.४: लोक प्रतिदीन १.२५ ते २.५० डॉलरमध्ये जगतात. भारतात ५१.१: लोक बहुआयामी दारीद्रयामध्ये जीवन जगतात असे हा अहवाल सांगतो.

त्याचबरोबर जगाच्या ८०: लोकांना सामाजिक सुरक्षेचे कवच उपलब्ध नाही. (सामाजिक सुरक्षा कवच म्हणजे निश्चित वेतन, निवृत्तीनंतर पेन्शन, अन्नाची हमी इ. होय.) भारतातील ९०: रोजगाार हे असंघटित क्षेत्रामध्ये आहेत, जेथे कोणतेही सुरक्षा कवच उपलब्ध नाही. भारतातील बेरोजगारीचा दर देखील ९.३: एवढा आहे (२००४—२०१३). त्याचवेळेस केवळ युवकांचा (वय १५ ते २४ वर्ष) विचार केल्यास हा दर १०.७: एकढा वाढतो.

वृध्द लोकांना मिळणाऱ्या पेन्शनचा विचार केल्यास भारतातील केवळ २४.१: लोकांना पेन्शन मिळते. (नॉर्वे, जर्मनीमध्ये हेच प्रमाण १००: तर बांग्लादेशमध्ये ३९.५: आहे!) या अहवालामध्ये 'मानवी असुरक्षा' दोन प्रकारामध्ये स्पष्ट केली आहे. ती पुढीलप्रमाणे –

**प्रकार**

मानवी असुरक्षा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात कशा पध्दतीने अस्तित्वात असते व समूहांच्या विचार केल्यास सर्वात जास्त असुरक्षित कोण आहे हे या प्रकाराव्दारे स्पष्ट केले आहे.

१. **जीवन चक्रामधील असुरक्षा (Life Cycle Vulnerabilities):** क्षमतांचा विकास आयुष्यभर होत असतो. या क्षमता विकसित होऊन त्या टिकून राहाव्या लागतात. क्षमतांचा विकास होण्याची दोन वैशिष्टये असतात. पहिले म्हणजे आयुष्याच्या एका टप्प्यावरील क्षमतांचे अस्तित्व त्याच्या पूर्वीच्या टप्प्यांमध्ये झालेल्या गुंतवणुकीवर अवलंबून असते. दुसरे म्हणजे अल्पकालीन जोखमींचा/धोक्यांचा परिणाम दीर्घकालीन असू शकतो. जसे आर्थिक मंदीमुळे मध्यम वर्गातील लोक पुन्हा दारिद्रयामध्ये लोटले जाणे. या अहवालानुसार जीवनचक्रामधील असुरक्षा विशेष करून तीन टप्प्यांवर आढळते. ते म्हणजे जन्मानंतर सुरूवातीचे १०० दिवस, १५ ते २४ वय वर्ष की, ज्यामध्ये कौशल्यनिर्मिती व रोजगारामधील प्रवेश निश्चित होतो आणि रोजगारामधून निवृत्त झाल्यावर निवृत्तीचे दिवस असे हे टप्पे आहेत. दारिद्रय, पोषक आहारांचा अभाव, आरोग्य सुविधांची कमतरता यामुळे बालपण (पहिला टप्पा) असुरक्षित झाले आहे. जगाच्या एकूण बालकांपैकी ९२: बालके विकसनशील राष्ट्रांमध्ये राहतात. यातील प्रत्येक १०० बालकांपैकी ७ बालके ५ वर्ष वय पूर्ण होण्यायच्या आतच दगावतात. १७ जणांची शाळांमध्ये कधीच नावनोंदणी होत नाही. ३० जणांची पूर्ण वाढ होत नाही ;जनदजमकद्ध. भारतामध्ये दक्षिण आशियातील सर्वात जास्त कुपोषित बालकांचे प्रमाण आढळते. देशातील ४८: बालके कुपोषित आहेत. तर भारतातील अर्भक मृत्यूदर प्रति १००० पाठीमागे ४४ तर बालमृत्यू दर प्रति १००० पाठीमागे ५६ एवढा आहे (२०१२). वय वर्ष १५ ते २४ हा कालखंड समाजामध्ये सहभागीत्व नोंदविण्यासाठी व कार्यामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी महत्वाचा ठरतो. प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांमध्ये युवकांचे प्रमाण वाढत आहे. भारतामध्ये हे प्रमाण एकूण देशाच्या लोकसंख्यंच्या २६.५ आहे. (१५ ते २९ वर्ष) त्ययाच वेळेस जागतिक पातळीवर युवकांचा बेरोजगारीचा दर १२.७: आणि भारतात १०.७: आढळतो. हा दर एकूण रोजगाराच्या दरापेक्षा जास्त आहे. सर्वात शेवटी वृध्दापकाळ हा सर्वात जास्त असुरक्षित मानला जातो. जगातील ८०: पेक्षा अधिक वृध्दांना कोणतीही पेन्शन उपलब्ध नाही.ज्यामुळे ते पूर्णपणे कुटुंबांवर विसंबून असतात किंवा वृध्दापकाळामध्ये देखील त्यांना काम करावे लागते.

२. **संरचनात्मक असुरक्षा (Structiral Vulnerabilities)** ज्या समाज्यामध्ये सामाजिक व न्यायिक संस्था, सत्ता केंद्रे, राजकीय घटक, प्रथा–परंपरा आणि सामाजिक सांस्कृतिक नियमने सर्व सदस्यांना समान रितीने वागणूक देत नाहीत. समतेच्याऐवजी संरचनात्मक अडथळे निर्माण करतात तेथे विशिष्ट मानवीसमूह हे

इतरांपेक्षा जास्त असुरक्षेला समोरे जातात. उदा. स्त्रिया, अल्पसंख्याक, अपंग, ग्रामीण लोक इ. भारतातील दलित अमेरिकेतील कृष्णवर्णीय हे समूह अशाच संरचनात्मक असमानतेने पीडित आहेत.

**स्थितीस्थापकत्वाची निर्मिती**

वरीलप्रमाणे असुरक्षित असणाऱ्या व्यक्तींना, मानवीसमूह व राष्ट्रांना त्यांच्या भविष्यकालीन संभाव्य प्रतिकूल परिस्थिपासून सुरक्षा प्रदान करणे हे स्थायी मानवी विकासासाठी आवश्यक आहे. यासाठी वविध प्रकारचे उपाय योजण्यात येतात.

२६ डिसेंबर २००४ रोजी आलेल्या भयंकर त्सुनामीमुळे हिंदी महासागराच्या किनारी असणाऱ्या १४ राष्ट्रांमधील २,३०,००० लोक मृत्यूमुखी पडले होते. अशाच प्रकारचे इतर नेसर्गिक संकटे जसे पूर, आवर्षण यामुळेदेखील लाखे लोक प्रभावित होतात. आर्थिक संकटाने प्रभावित होऊन दारिद्रयामधील लोकांचे प्रमाण वाढते. २००८ मधील आर्थिल संकटामधून अजूनही बाहेर न पडलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण मोठे आहे. जसे फ्रान्स (11%) ग्रीस (28%) इ. तसेच आरोग्यविषयक संकटामुळे उत्पन्नाचा स्तर कमी होतो.

वरील प्रकारची असुरक्षता कमी करण्यासाडी प्रतिबंधातमक उपाय योजणे हा एक मार्ग आहे.

जसे की, क्योटो करारावदारे कर्ब वायु उत्सर्जनाचे प्रमाण कमी सहाय्याने व्यापारातील अडथळे दूर करणे इ. होय. पण प्रत्येकवेळी 'प्रतिबंध' हाच उपाय यशस्वी होईल याबद्दल खात्री नसते. अशावेळी वरील प्रकारच्या संकटाच्या परिणामांची तीव्रता ही सजजता व प्रतिसाद क्षमतांच्याव्दारे ;च्तमचंतमकदमे दक तमेचवदेम बचंइपसपजपमेद्ध कमी करता येते. नैसर्गिक संकटे टाळणे कठीण असते. परंतु पर्यावरणीय बदलांवर निरीक्षणाव्दारे लक्ष ठेवून सुसज्जता ठेवता येते. जेणे करून हानीचे प्रमाण कमी होऊ शकते. जसे ऑक्टोबर २०१३ मध्ये पूर्व किनारपट्टीवर फायलीन चक्रीवादळामुळे केवळ ५० व्यक्तींना आपलाजीव गमवावा लागला कारण वादळापूर्वी हवामान खाते, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समिती व जिल्हा पातळीवरील शासकीय कार्यालयांच्या तत्परता, सुसज्जता व शीघ्र प्रतिसादामुळे हजारो लोकांना सुरक्षितस्थळी अगोदर पोहचले गेले होते. मात्र अशाच प्रकारच्या वादळामुळे १९९९ साली याच किनारट्टीवर १०,००० लोकांचा बळी गेला होता.

वरील दोन उपायांबरोबर (प्रतिबंध व सुसज्जता—प्रतिसाद क्षमता) असुरक्षा व्यवस्था कमी कमी करण्याचा तिसरा प्रभावी मार्ग म्हणजे लोक व समुदारयादरम्यान स्थितीस्थापकत्व (Resilience) निर्माण करणे हा होय.

'सद्य:स्थितीमधील व भविष्यातील विकासाच्या संधी वुध्दींगत करून लोकांमध्ये प्रतिकूल घटना व परिस्थितीला सामोरे जाण्यास व समायोजनास (Cope up and adjust) आवश्यक क्षमतांची निर्मिती करणे म्हणजे स्थितीस्थापकत्व होय.'

लोकांच्या असुरक्षा कमी करून त्यांची स्थितीस्थापकत्वाची क्षमता वाढवण्यासाडी काही राष्ट्रीय धोरणात्मक बाबी नमूद केलेल्या आहेत, ज्याव्दारे वैयक्तिक व सामुदायिक स्तरावर लोकांक्ष्या क्षमतांची वृध्दी घडवून आणता येईल. त्या पुढीलप्रमाणे—

१. **सामाजिक सेवांची वैश्विक उपलब्धता —** वैश्विकता म्हणजे गाभाभूत क्षमतांची निर्मिती करण्यासाठी आवश्यक संधीची सर्वांना समान उपलब्धतता होय. या सामाजिक सेवा म्हणजे शिक्षण, आरोग्याची सुविधा, पेयजल व स्वच्छता, सामाजिक सुरक्षा इ. होय. अशा सामाजिक सेवांच्या वैश्विक उपलब्धतेमुळे क्षमतांचा विकास होऊन प्रतिकूल परिस्थितीला (असुरक्षा) सामोरे जाता येते. जसे की, सार्वत्रिक शिक्षणाच्या संधीमुळे श्रीमंत व गरीब मुलांच्या विकासामधील दरी दूर करता येते. समाजात सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी मदत होते.

२. **जीवन चक्रासंबंधीची असुरक्षा दूर करणे :** जीवन चक्रामधील सुरूवातीच्या १००० दिवसांमध्ये १५ ते २४ वर्ष वयाचा कालखंड (शिक्षण ते रोजगारामधील प्रवेश) व निवृत्तीनंतरचे आयुष्य या तिन्ही टप्प्यांवर 'वेळेवर होणारी गुंतवणूक' (TimelyInvestment) महत्वाची असल्याचे अहवाल सांगतो. त्यासाठी स्वीडन देशाच्या प्रतिमानाची शिफारसदेखिल करतो. ज्यानुसार जन्मापूर्वी व जन्मानंतरची काळजी, पालकांचे शिक्षण व प्रशिक्षण, पोषक व उत्पनन या व्यक्तीच्या सुरूवातीच्या टप्प्यांमध्ये अधिक गुंतवणूक केली जाते. विकसनशील राष्ट्रांमध्ये जी बालके दारिद्रयामध्ये जन्मतात त्यांना वरील प्रकारची काळजी व संधी उपलब्ध होत नाही. परिणामी शिक्षणातील अधोगती, निकृष्ट आरोग्य यामुळे पुढे उचित ;क्मबमदजद्ध रोजगार मिळविण्यामध्ये ती अपयशी ठरतात. त्यामुळे ते त्यांच्या पाल्यांनादेखील उततम शिक्षण, पोषण या बाबी पुरवू शकत नाहीत. म्हणजेच दारिद्रय एका पिढीडून दुसऱ्या पिढीकडे अशाप्रकारे हस्तांतरित होत जाते.

३. **पूर्ण रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन :** जीवनचक्रामधील दुसरा टप्पा की जेथे रोजगार क्षेत्रामध्ये प्रवेश व प्रत्येक व्यक्तीला सन्मानजनक जीवन जगण्यासाठी रोजगार या मानव विकासामधील दोनमहत्वाच्या बाबी ठरतात. अहवाल स्पष्ट करतो की केवळ किंमत नियंत्रण व महागाई वाढ रोखणे हे लोकांच्या जीवनमानाच्या विकासासाठी पुरेसे नाही तर त्यापेक्षा श्रम बाजाराशी संबंधित कृतीप्रवण धोरणे, स्थूल अर्थशास्त्रीय धोरणे, कृषीवरील अवलंबित्व कमी करून व्दितीयक व तृतीयक क्षेत्रांमधील संघटिक क्षेत्रातील रोजगारामध्ये वाढ घडवून आणणे हे मध्यम व दीर्घ काळातील स्थितीस्थापकत्वासाठी गरजेचे आहे, असे अहवाल सांगतो.

अहवालामध्ये चीनचा विकासदर वाढवून वाढत्या रोजगाराची गरज पूर्ण करण्याचे किंवा भारताच्या 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा' पुरस्कार किंवा प्रशंसा केली आहे. पण त्याचवेळेस भारताच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुहे लोक स्थितीशील बनून अधिक चांगल्या रोजगाराच्या शोधाची गतिशिलता हरवून बसतात, अशी टिप्पणीदेखिल केली आहे.

४. **सामाजिक सुरक्षेचे मजबुतीकरण :** सामाजिक सुरक्षेचे कवच म्हणजे बेरोजगारीच्या काळातील विमा संरक्षण, निवृत्ती वेतनाची उपलब्धता (पेन्शन), श्रम बाजारातील नियमने व नियंत्रणे ही परिस्थितीमध्ये व्यक्तींना जोखमीपासून संरक्षण पूरवू शकतात. अशा सामाजिक सुरक्षा कार्यक्रमांच्या उपलब्धतेमुळे कुटुंबांना संकटसमयी स्वत:कडील मालमत्ता विकावी लागत नाही. आपल्या मुलांना शाळेमधून बाहेर काढून कामाला पाठवावे लागत नाही. आरोग्यावरील अनिवार्य खर्च पूर्ण करता येतो. म्हणजेच त्यांच्या मानव विकासाच्या प्रक्रियेवर विपरीत परिणाम होणार नाही. बेरोजगारीसंबंधी विम्याच्या संरक्षणेमुळे लोकांना मिळेल तो रोजगार

स्विकारण्याचे बंधन उरणार नाही व ते उचित रोजगार मिळेपर्यंत वाट पाहू शकतील. अशा सामाजिक सुरक्षा उपायांचा फायदा केवळ वैयक्तीक न राहता अर्थव्यवस्थेलादेखील होतो.

५. **प्रतिसादात्मक संस्था व संयोगी समाज उभारणी** –गरीब व असुरक्षित लोकांना शिक्षण, आरोग्य रोजगार पुरविण्यासाठी पुरेशा धोरणातमक व संसाधनात्मक साहाय्याची गरज असते. असे सहाय्य राज्य संस्था पुरवू शकते. समाजामध्ये काही घटक ऐतिहासिक कालखंडापासून बहिष्कृत व असुरक्षेची भावना दूर करून सामाजिक अशांतता टाळण्यासाठी प्रतिसादात्मक व जबाबदार प्रशासन संस्थांची गरज असते व राज्य येथे महत्वाची भूमिका बजावू शकते.